**K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR**
**ASSESSMENT – V (2022-23)**

**GRADE: IV** **MARKS: 40**
**SUB: MARATHI** **TIME: 2 Hrs**

---

**प्रश्न १. खालील पठित उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(६ गुण)**

दक्षिण भारतात हा सण पोंगल म्हणून साजरा केला जातो व शेतीशी संबंधित आहे. पोंगल पर्व चार दिवस साजरे केले जाते. 1. थाई पोंगल:- इंद्र देवाची पूजा व प्रार्थना. 2. भोगी पोंगल:- नवीन तांदूळ, गुळ, उसाचा रस, दूध इत्यादी चा वापर करून भात करतात व सूर्य देवाला नैवेदय दाखवितात. 3. माट्टु पोंगल:- गाई व बैलांचे पूजन करून त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त केली जाते. 4. कन्नुम पोंगल:- भाऊ व घरातील कन्यांचे पूजन करतात.
उत्तर भारत - पंजाब,हरियाणा हिमाचल प्रदेश राजस्थान, जम्मू काश्मीर मध्ये हा सण वर्षाचा पहिला सण म्हणून उत्साहाने साजरा करतात. पंजाब, हरियाणात याला लोहड़ी म्हणतात. थंडी पळवून लावण्यासाठी भली मोठी शेकोटी पेटवून त्यात लाह्या गंजग, गुळ, ऊस इत्यादी टाकून अग्नी देवतेची पूजा करतात.

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. गाई व बैलांचे पूजन करून त्यांच्या विषयी --------------- व्यक्त केली जाते.
२. थाई पोंगल मध्ये ------------ पूजा व प्रार्थना करतात.
३. दक्षिण भारतात हा सण --------------- म्हणून साजरा केला जातो.

**आ) खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

१. पंजाब, हरियाणात मकरसंक्रांतीला काय म्हणतात?
२. कन्नुम पोंगल मध्ये कोणाचे पूजन करतात?
३. पोंगल पर्व किती दिवस साजरे केले जाते?

**प्रश्न २. खालील शब्दांचे अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा.** **(४ गुण)**

१. उच्चस्वर –
२. एकाग्रता –

**प्रश्न ३. खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.** **(३ गुण)**

१. कोकीळा कोणाच्या घरट्यात अंडी घालते?
२. आंतरराष्ट्रीय पतंग महोत्सव कुठे साजरा केला जातो?
३. नरेंद्रना आई प्रेमाने काय म्हणत होती?

**प्रश्न ४. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२ गुण)**

१. आजीने विहंगला काय सांगितले होते?
२. मन एकाग्र करण्याचा सोपा मार्ग कोणता?

**प्रश्न ५. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **(४ गुण)**

१. नरेंद्रच्या यशस्वीतेला कोणती गोष्ट कारणीभूत ठरली?
२. कोकीळ पक्षी कसा आहे?

**प्रश्न ६. खालील अपठित उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(६ गुण)**

नागपूर जिल्ह्यात नरखेड तालुक्यात असलेले मोहदी हे खेडेगाव. गावातील सर्व लोक गुण्यागोविंदाने राहतात. या गावापासून आठ- दहा किलोमीटर अंतरावर 'कर्णागड' नावाचा एक पौराणिक गड आहे. गुरे चारणारे गुराखी दररोजच तिथे जातात. सहल काढणारे, ट्रेकिंगप्रेमी हे सुद्धा तिथे जाताना दिसतात.

गडाच्या पायथ्याशी मंदाकिनी नदी बारमाही झुळझुळत असते. नदीच्या दोन्ही तीरांवरील शेतमळे बारा महिने हिरवेगार असतात. पावसाळ्यात आणि हिवाळ्यात तर हा प्रदेश पाचूचा वाटतो. उन्हाळ्यात गडावर वाळलेला पाला -पाचोळा दिसतो. तरीही रानमेव्यांची अनेक प्रकारची झाडे तिथे फळांनी लदबदलेली असतात.

**अ) खालील इंग्रजी शब्दांचे मराठी अर्थ उताऱ्यातून शोधून लिहा.**

१. Picnic - २. River- ३. Months-

**आ)खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

१. पौराणिक गडाचे नाव काय आहे?
२. गडाच्या पायथ्याशी कोणती नदी बारमाही झुळझुळत असते?
३. मोहदी हे खेडेगाव कोणत्या जिल्ह्यात आहे?

## <u>व्याकरण विभाग</u>

**प्रश्न ७. अ) खालील अंक अक्षरात लिहा.** **(३ गुण)**

१. ७६ - २. ९२ - ३. ८० -

**आ) खालील वाक्यांतील काळ ओळखा व लिहा.** **(४ गुण)**

१. मी पोहायला शिकणार आहे.
२. जॉन फुटबॉल खेळला.
३. राम आंबा खातो.
४. मुले बागेत खेळत होती.

**इ) खालील शब्दांचे लिंग बदला.** **(३ गुण)**

१. चिमणा – २. राघू – ३. पोपटीण -

## <u>लेखनविभाग</u>

**प्र ८. खालील चित्राचे निरीक्षण करा आणि चित्राच्या आधारे कथा लिहा.कथेला योग्य शीर्षक द्या.** **(५ गुण)**



**किंवा**

**प्र ८. शाळेच्या ग्रंथालयासाठी पुस्तक विक्रेत्यांकडून पुस्तके पाठविण्याची विनंती करणारे पत्र लिहा.** **(५ गुण)**

**************************************************************************